राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

# कोविड-१९ अंतर्गत कंत्राटी पदभरती जाहीरात

## जिल्हा आरोग्य सोसायटी, जिल्हा परिषद, सातारा अंतर्गत खालील कंत्राटी पदे प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे भरावयाची आहेत.

### RT- PCR Lab जिल्हा रुग्णालय सातारा

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | पदसंख्या | मानधन | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | Micro Biologist | MD Microbiology | 02 | Rs.75000/- | RT PCR Lab District Hospital Satara |
| २ | Pathologist | MD Pathologist/DCP | 01 | Rs.75000/- | |
| ३ | Micro Biologist | M.Sc Microbiologist | 02 | Rs.45000/- | |
| ४ | Lab Technician | B.Sc DMLT | 04 | Rs.17000/- | |
| ५ | Lab Assistant | 12th Science | 03 | Rs.15500/- | |
| ६ | Ward Boy/ Servant | SSC/HSC | 03 | Rs.400/- Per Day | |
| | एकुण | | 15 | | |

**अटी व शर्ती:-**

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्तीचा कालावधी हा कोरोना विषाणुची साथ असेपर्यंत राहील.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हताधारकास प्राधान्य दिले जाईल.

६) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा परिषद, सातारा येथील नोटीस बोर्डवर व सातारा जिल्हा परिषदेच्या **www.zpsatara.gov.in** वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल, याबाबत कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

७) निवड यादीतील गुणाक्रमांकाच्या आधारे प्राधान्याने पदस्थापना दिली जाईल, त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करण्यात येईल.

८) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील. पद क्र १ व २ करीता वयोमर्यादा अधिकतम ७० वर्षे राहील.

९) शासकीय/निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

१०) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरीता, वैद्यकिय अधिकारी ई. पदांकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारस मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

११) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

Scanned with CamScanner

**विशेष सुचना:-** जाहीरात दिलेनंतर वरील अ.क्र. १ ते ३ साठी उमेदवार उपलब्ध झाला नाही तर फक्त त्याच पदांची मुलाखत दर मंगळवारी सकाळी ११.०० वाजता होईल. जर मंगळवारी सुटटी असेल तर दुसऱ्या दिवशी मुलाखत होईल.

**मुलाखत दिनांक:- प्रत्यक्ष मुलाखतीसाठी दि. २७/०६/२०२० ते ३०/०६/२०२० पर्यंत जिल्हा परिषद वेबसाईटवर याबाबत माहिती प्रसिध्द केली जाईल.**

**मुलाखतीचे स्थळ:- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांचे दालन**

- **अर्ज भरण्याचा कालावधी :- दि. २२/०६/२०२० ते दि. २६/०६/२०२० रोजी संध्याकाळी ०६.०० पर्यंत**
- **पदांची माहिती, संख्या, संवर्ग व पदस्थापना पाहण्याचा वेबसाईटचा पत्ता:- www.zpsatara.gov.in**
- **ऑन लाईन अर्ज भरण्याची लिंक:-** http://bit.ly/NHMSTR
- OR QR Code

**खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जासोबत जोडाव्यात.**

१. शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
२. राखीव पदांसाठी जातीचे प्रमाणपत्र
३. शाळा सोडल्याचा/जन्म तारखेचा दाखला
४. प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे
५. पासपोर्ट आकाराचे २ फोटो
६. फक्त शासकीय/निमशासकीय व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अनुभव असलेस अनुभव दाखला

सही
सदस्य सचिव
जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
एनएचएम,जि.प. सातारा

सही
सदस्य
जिल्हा शल्यचिकित्सक
जिल्हा रुग्णालय, सातारा

सही
सदस्य
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, सातारा

सही
अध्यक्ष, निवड समिती
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा

Scanned with CamScanner